नाशिक
दि.०१/०६/२०२१

# प्रेसनोट

**बाजीराव केदु भामरे, पोलीस हवालदार ब.नं. १५६०, नेमणुक अभोणा पोलीस स्टेशन, जि. नाशिक ग्रामीण यांनी १५,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल केले बाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | अभोणा पोलीस स्टेशन जि.नाशिक गु.र.नं.३५४/२०२१ अन्वये |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन—१९८८( सुधारीत सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपींचे नांव व कार्यालय** | बाजीराव केदु भामरे, पोलीस हवालदार ब.नं. १५६०, नेमणुक अभोणा पोलीस स्टेशन, जि. नाशिक ग्रामीण. |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | १५,०००/— रुपये |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | १५,०००/— रुपये |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांचा आलोसे बाजीराव केदु भामरे, पोलीस हवालदार ब.नं. १५६०, नेमणुक अभोणा पो.स्टे.,जि.नाशिक ग्रामीण यांनी दि.२१/४/२०२१ रोजी वाळुने भरलेला ट्रॅक्टर पकडून तक्रारदार यांचे भावाविरूध्द अभोणा पोलीस स्टेशन येथे वाळु चोरीचा गुन्हा दाखल केला असून सदर गुन्हयात मदत करण्यासाठी व ट्रॅक्टर पुन्हा वाळु वाहतुक नियमित करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १५,०००/— रुपये लाचेची मागणी केल्यामुळे तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाचे पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे बाजीराव केदु भामरे, पोलीस हवालदार ब.नं. १५६०, नेमणुक अभोणा पो.स्टे., जि. नाशिक ग्रामीण यांनी तक्रारदार यांचेकडून पंच व साक्षीदारांसमक्ष प्रवीण ज्वेलर्स समोर सिडको, नांदुरीरोड,अभोणा,ता.कळवण, जि.नाशिक येथे १५,०००/—रूपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दि.३१/५/२०२१ रोजी स्विकारली असतांना त्यांना पकडण्यात आल्याने त्यांचेविरुध्द अभोणा पोलीस स्टेशन, जि.नाशिक ग्रामीण येथे गु.र.नं. ३५४/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन—१९८८ (सुधारीत सन—२०१८) चे कलम ७ प्रमाणे दि. ०१/०६/२०२१ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्यशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालय
संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in
ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

( नरेंद्र पवार ) 01/06/2021
पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक
सत्यमेव जयते